प्रकरण **9**

निर्णय घेण्याच्या प्रक्रियेची कार्यप्रणाली

**1)** आस्थापना प्रकरणे

जेव्हा एखादे पद रिक्त असेल किंवा रिक्त होणार असेल तेव्हा त्यासंबंधीची पदे भरण्यासाठी माहिती कामगार अधिकारी / अधिक्षिका / उप कार्यकारी आरोग्य अधिकारी (मुख्यालय) यांना प्रमुख वैद्यकिय अधिक्षिका (उपनगरीय रुग्णालये) यांच्या मार्फत कळविण्यात येते. जर एखादे नवीन पद निर्माण करावयाचे असेल तर तसा प्रस्ताव करून प्रमुख वैद्यकिय अधिक्षिका (उपनगरीय रुग्णालये) यांच्या मार्फत सक्षम अधिका-यांकडून मंजूर करून घेण्यात येतो. व त्यानंतर पदे भरण्यात येतात.

**2)** खरेदी आणि दुरुस्ती

रुग्णालयाकडून यंत्रसामुग्री खरेदीचे प्रस्ताव कार्यकारी अभियंता (ऋणकणीय कक्ष / कार्यकारी अभियंता (यांत्रिकी व विद्युत) यांच्याकडून मान्यता घेऊन प्रमुख वैद्यकिय अधिक्षिका (उपनगरीय रुग्णालये) यांच्या मार्फत सह आयुक्त (वै. शि. व. आ.) / महानगर पालिका आयुक्त / स्थायी समिती यांच्याकडे यंत्रसामुग्रीच्या किंमतीनुसार प्रशासकिय मान्यतेसाठी पाठविले जातात. अशी मान्यता मिळाल्यावर निविदा मागविण्यात येतात. लेखा अधिकारी यांच्याकडून छानननी झाल्यावर मंजूरी घेऊन मागणीपत्रक पाठविले जाते.